INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

Chief Editor :

Dr. Dhanraj T. Dhangar,

Assist. Prof. (Marathi)

MGV'S Arts & Commerce College,

Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY



Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | Well-Being of The Employed Women And House wives | Dr. Ganesh Lokhande | 133 |
| 30 | On Reading Brave New World in A Brave New World: Reflections on the Contemporary Relevance of Aldous Huxley's Imagination | Abin Sojan | 138 |
| 31 | Multiculturalism: A Study of Urban Culture in Chetan Bhagat's Novels | Sambhaji Vaman Narute | 142 |
| 32 | J Krisnamurti's Criticism on Religion | Dr. S D Deshbhratar | 144 |
| 33 | Availability and Acceptance of E-Books Models: A Case Study of Jayakar Knowledge Resource Centre, SPPU,Pune | Vrushali Borkar & Dr. Rajendra Marwade | 148 |
| 34 | Kurtz As A Brechtian Protagonist in Conrad's Heart of Darkness: A Study | Dr. Uttam B. Parekar | 154 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 35 | माता प्रसाद के नाटकों में दलित दर्द की दाँसता | श्री. किरण चव्हाण | 162 |
| 36 | प्रयोगवाद को समर्पित साहित्यकार – अज्ञेय | दीपक लहारे | 168 |
| 37 | सुर्यबाला के कहानियों में चित्रित नौकरी करनेवाली नारीयाँ | डॉ.बी.एस.बलवंत | 170 |
| 38 | अनंत गोपाल शेवडे:हिंदी उपन्यास साहित्य में योगदान | डॉ.अनिल साळुंखे | 172 |
| 39 | निराला की काव्यभाषा | डॉ.संतोष आडे | 176 |
| 40 | मानव-मूल्य-सैद्धांतिक परिप्रेक्ष्य | डॉ.संतोष पवार | 180 |
| 41 | राकेश भातीय द्वारा अनुदित कहानियों में मानवी मुल्यो का ऱ्हास (माँ/घर जना/पहरुआं के संदर्भ में) | डॉ.अनिल साळुंखे | 186 |
| 42 | संवेदनशील रचनाकार डॉ.सूर्यबाला | डॉ. बी.एस.बलवंत | 189 |
| 43 | शैलीविज्ञान की दृष्टी से भाषा और काव्य का संबंध | दीपक लहारे | 192 |
| 44 | चैतन्यवेदान्त में शिक्षा की संकल्पना | सीमा शर्मा | 194 |
| | **मराठी विभाग** | | |
| 45 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना | प्रा.श्री.चंद्रकांत मोरे | 198 |
| 46 | ओवी गीतातील स्त्रियांचे भावविश्व | डॉ.अनिल गर्जे | 201 |
| 47 | स्वामी विवेकानंद:राष्ट्रीय अवनती व पुनरुत्थानाची करणे | डॉ.प्रवीण कारंजकर | 206 |
| 48 | पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण | डॉ.बाबासाहेब मोताळे | 210 |
| 49 | मराठा समाज सध्यस्थिती व आरक्षण | डॉ.दीपक सूर्यवंशी | 214 |
| 50 | कवितांचे बदलते आयाम आणि अध्यापन पद्धती | डॉ.नरसिंग कदम | 217 |
| 51 | केशव देशमुख यांची ग्रामीण कविता | डॉ.मारोती घुगे | 221 |
| 52 | थोर स्वातंत्र्य सेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचा अभ्यास | डॉ.संभाजी पाटील | 226 |
| 53 | बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याची विविधता आणि आशयघनता | प्रा.मिलिंदकुमार देवरे | 231 |
| 54 | गौतम बुद्ध मराठी चरित्र ग्रंथातील ववाण्मयीन विशेष :एक आकलन | डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर व शिवाजी गायकवाड | 236 |
| 55 | नेमाडे यांचा देशीवाद | डॉ.राकेश कभे | 244 |
| 56 | आशियातील बौद्ध संस्कृती | प्रणेती कांबळे | 249 |
| 57 | तंत्रास्नेही शाळा बी.एड् प्रशिक्षणार्थ्यांना अध्ययन व अध्यापन अनुभव घेण्याचा प्रभावी व अद्यावत उपाय | डॉ.दादासाहेब पवार | 252 |
| 58 | साठोत्तरी मराठी कविता-एक समीक्षा | डॉ.सुष्मा प्रधान-घेवंदे | 255 |
| 59 | आरक्षण:दशा आणि दिशा | प्रा.प्रदीप जगताप | 258 |
| 60 | भारतातील जात आणि विशेष संदर्भ उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील चर्मकार समाजाच्या राजकारणाचा अभ्यास | श्री.राजेंद्र आगवाने | 263 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261
UGC Approved Journal | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

# आरक्षण : दशा आणि दिशा

प्रा. प्रदीप जगताप
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत जि. अहमदनगर
मो. नं. ९९२३०६८१७३
jpradeep.sonu@gmail.com.

**प्रस्तावना :–**

आजच्या राजकीय पर्यावरणात 'आरक्षण' हा परवलीचा शब्द बनलेला आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजाचे आंदोलन, धनगर समाजाचे आंदोलन, मुस्लिमांचे आंदोलन तर हरियाणा मधील जाटांचे आंदोलन, गुजरात मधील पटेलांचे आंदोलन, आंध्रप्रदेशातील कापूंचे आंदोलन यामुळे आरक्षणाचा विषय तीव्रतेने चर्चेत आहे. आरक्षणाचे समर्थक व विरोधक आपापल्या भूमिका समर्थपणे मांडताना दिसतात. राजकीय पक्ष या मुद्याकडे राजकारणाचे साधन म्हणून पहात आहेत. स्वार्थी पक्षीय राजकारणासाठी धंदेवाईक नेत्यांकडून आरक्षणाचा कौशल्याने वापर होताना दिसत आहे. सामाजिक न्याय आणि राजकारण या दोन गोष्टींची गल्लत करून राजकारण करण्यासाठी 'आरक्षणास्त्र' वापरले जात आहे. आरक्षण हे राजकारणाखेरीज सामाजिक न्यायाचे एक सार्वजनिक धोरणात्मक साधन आहे हे लक्षात न घेता राजकारणाचे साधन म्हणून आरक्षणाकडे पाहिले जात आहे. त्यामुळे आरक्षणाचा हेतू बाजूला पडून समाजामध्ये जातीय तेढ वाढून सामाजिक ऐक्य व सुव्यवस्था धोक्यात येवू पहाते आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षणाचा चिकित्सक अभ्यास करून आरक्षणाचा हेतू, त्याचा इतिहास, त्याची वाटचाल यावर सदर शोधनिबंधात प्रकाश टाकला आहे. आरक्षणाकडे जातीय व राजकीय भूमिकेतून न पाहता सामाजिक न्यायाच्या, विवेकाच्या व मानवतावादी दृष्टीने पाहण्याची भूमिका मांडली आहे.

सोयी व सुरक्षिततेसाठी, उद्दिष्टपूर्ती करिता आरक्षण आवश्यक आहे. आरक्षण हा मराठी शब्द 'त्मेमतअंजपवद' या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. आरक्षण हा शब्द संरक्षणात्मक विभेदीकरण, रक्षात्मक भेदभाव या अर्थांनी वापरला जातो.आरक्षणाला अमेरिकेत ।पितउंजपअम ।बजपवदए कॅनडामध्ये म्उचसवलउमदज म्ुंपजल तर इंग्लडमध्ये Positive Discrimination असे म्हणतात. Reverse Discrimination , Protective Discrimination म्हणूनही ओळखले जाते. आरक्षण हा शब्द समान वाटप अथवा सर्वानां समान असा चुकीचा अर्थ आज घेतला जाऊ लागला. म्हणून इतरांप्रमाणे आपल्यालाही आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाऊ लागली आहे. आरक्षणाचा अर्थ किंवा प्रमुख हेतू 'सर्वांना समान वाटप' असा नसून, समाजातील दुर्लक्षित घटकांना समान पातळीवर आणण्यासाठी त्यांना दिलेली विशेष संधी हा त्याचा अर्थ आहे. भारतीय समाजाच्या संदर्भात सांगावयाचे झाल्यास सामाजिक दृष्टिकोनातून दुर्लक्षित, शोषित व मागास लोकांना दिली गेलेली विशेष संधी होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, श्त्मेमतअंजपवदए वित जीवेम ूव तम दवज कमुनंजमसल तमचतमेमदजमकश म्हणजेच 'ज्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही, त्यांना आरक्षण किंवा ज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात पर्याप्त प्रतिनिधित्व मिळाले नाही, त्यांना आरक्षण.

आरक्षणातून विषमतेऐवजी समता, अन्यायाऐवजी न्याय, गुलामगिरीऐवजी स्वातंत्र्य असे मूल्यांतर घडत असते. म्हणून आरक्षण हा मूल्यांतर घडवून आणण्याचा उचित मार्ग आहे. आरक्षणामुळे शोषित व शोषितांच्या दृष्टिकोनात मूलगामी बदल होत असतो. म्हणून आरक्षण हे क्रांतिकारक परिवर्तनाकडे टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे. या दृष्टीकोनातून आरक्षणाकडे पाहण्याची आज आवश्यकता आहे. भारत देश विषमतेचे माहेरघर



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

आहे. ही विषमता सामाजिक भेदभावांमुळे अस्तित्वात आली. मागास समजल्या जाणाऱ्या जाती – जमातींना सत्ता, संपत्ती आणि शिक्षणापासून वंचित ठेवण्याची शिकवण भारतीय समाजव्यवस्था देते. जातिभेद आणि अस्पृश्यता ही उच्चवर्णीयांची अपत्ये होत. वंशवादी, धनदांडग्या, शोषक व अत्याचारी जाती स्वत:ला उच्चवर्णीय व उच्चजातीय म्हणवितात. बहुजन समाजाला मात्र निम्न व कनिष्ठ दर्जाचे समजले जाते. या बहुजन समाजाला दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्यास महात्मा फुले, राजर्षि शाहु महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेले क्रांतीकारी धोरण म्हणजे 'आरक्षण' होय. भारतात समानता प्रस्थापित करण्याचा मार्ग म्हणजे 'आरक्षण' होय. आरक्षण ही एक सकारात्मक भेदभाव करणारी व्यवस्था आहे. ज्यांना सामाजिक इतिहासामुळे संधीच नाकारली गेली आहे, त्यांना समान संधी प्राप्त व्हावी म्हणून केलेली सोय म्हणजे आरक्षण होय. थोडक्यात वंचित, उपेक्षित, दूर्लक्षित माणसाला समर्थपणे उभा करण्याचे साधन म्हणजे आरक्षण होय.

भारतीय संविधानात आरक्षणाच्या संदर्भात पुढील तरतुदी केलेल्या आहेत. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यातील कलम १४ मध्ये कायदयापुढे भारतातील प्रत्येक व्यक्ती समान आहे. कायदयाचे समान संरक्षण सर्वांना असेल. कायद्यापुढे धर्म,वंश,जात,लिंग,जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव केला जाणार नाही. कलम १६(४) यानुसार राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी मान्य करण्यात आली व ३३५ व्या कलमानुसार संघराज्य व राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद आहे. कलम ४६ नुसार दुर्बल घटक यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्वप्रकारचे शोषण यांपासून त्यांचे संरक्षण करील. कलम १६४ नुसार राज्यातील एका मंत्र्याकडे इतर मागासवर्गीयांचे कल्याण कार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रभार असेल. कलम २४३ नुसार शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला व मागासवर्गीय लोकांकरीता आरक्षणाची तरतूद केलेली आहे. कलम ३३०नुसार लोकसभेत आरक्षण कलम ३३२ नुसार राज्य विधानसभेत आरक्षण देण्यात आले आहे. कलम ३४० नुसार राष्ट्रपती भारतातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या लोकांची परिस्थिती शोधण्यासाठी आयोगाची स्थापना करू शकतात.

भारतीय संविधाना नुसार सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी अनुसूचित जामाती, इतर मागासवर्गीय यांना आरक्षण दिले आहे. त्याचबरोबर महिला, अपंग, माजी सैनिक, खेळाडू, विस्थापित, अल्पसंख्याक यांनाही आरक्षण दिलेले आहे. असे असले तरी सर्वात जास्त चर्चा ही अनुसूचित जाती – जमाती व इतर मागासवर्गीय आरक्षणाची होताना दिसते. ही चर्चा करताना सर्वसाधारणपणे आरक्षण समर्थन करणे आणि त्यातून आपले पुरोगामीत्व सादर करणे आणि दुसरी बाजू म्हणजे आरक्षणाला विरोध करून जातीव्यवस्थेला संपवून समतेचा आग्रह धरतात. आरक्षणाच्या विषयावर स्वातंत्र्यपूर्व काळापासून वाद होताना दिसतात. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १९३२ मध्ये जातीय निवाडा जाहीर करून आरक्षणाचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये सरळसरळ दोन गट निर्णय झाले. हिंदू समाजाचे ऐक्य – राष्ट्रवाद हा मुद्दा महात्मा गांधीचा होता तर सामाजिक न्याय हा मुद्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. भारतीय संविधानात आरंभी दलित व आदिवासींचे आरक्षण प्रस्ताव सामील केला गेला, त्यानंतर ओ.बी.सी. आरक्षणाचा प्रस्ताव चर्चा करण्यासाठी पुढे आला. नंतर काकासाहेब कालेरकर आयोग आणि मंडल आयोग नेमले गेले. ओ.बी.सी. आरक्षणाच्या मुद्दयावर विश्वनाथ प्रतापसिंग सरकार पराभूत झाले. आरक्षणाला विरोध करण्यासाठी ऐंशीच्या दशकात देखील 'हिंदु समाजाचे ऐक्य' हा मुद्दा प्रभावीपणे मांडला जात होता. आरक्षण विषयाची विवेकशील परिचर्चा न करता आरक्षणाचा संबंध मतपेटीशी जोडला गेला. त्यामुळे वितरणात्मक न्याय किंवा सकारात्मक कृती हा मुद्दा मागे पडला आणि आरक्षणाचे राजकारण सुरू झाले.



Scanned with CamScanner

राजकीय पक्षांकडून आरक्षण या विषयावर राजकारण करण्याचा प्रयत्न होत आहे. आरक्षण आणि राजकारण यांच्या संबंधातून दोन प्रकारच्या राजकीय प्रक्रिया घडल्या आहेत. एक म्हणजे आरक्षणाचे राजकीयीकरण ही प्रक्रिया घडली आहे. दुसरी प्रक्रिया म्हणजे राजकारणाचे आरक्षणीकरण झाले आहे. आरक्षणाचे राजकीयीकरण या प्रक्रियेमध्ये राजकीय कृतिप्रवणता आणि सामाजिक न्याय विरोधी राजकारणाचे केंद्रीकरण झाले आहे. आरक्षणाचा मुद्दा राजकारणाला विशिष्ट आकार देतो. राजकारण करताना समाजाचे विभाजन दोन – तीन गटांमध्ये केले जाते. या प्रकारचे राजकारण राज्यकर्ते आणि राज्यसंस्था आरक्षण या मुद्दयाच्या आधारे करते. आरक्षणाच्या आधारे मतदारांचे दोन गटांमध्ये विभाजन केले जाते. 'आरक्षण समर्थक' आणि 'आरक्षण विरोधक' अशा दोन गटांमध्ये विभाजन करण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात. आरक्षणाच्या चौकटींमध्ये सार्वजनिक धोरणांची आणि योजनांची निश्चिती केली जाते. राजकीय पक्षांना राजकीय कृतिप्रवणता घडून आणण्यासाठी 'आरक्षणाचा मुद्दा' उपयुक्त ठरतो.

आरक्षणामुळे संविधानातील 'समता' या तत्वाला धक्का पोहचतो, आरक्षणामुळे गुणवान विद्यार्थ्यावर अन्याय होतो, जो सामर्थ्यवान असेल तो टिकेल म्हणून राखीव जागा बंद व्हाव्यात, आरक्षणामुळे प्रशासनाचा दर्जा घसरेल, आरक्षण हा एक प्रकारचा कायदेशीर सूड आहे, आधी दलितांनी भोगले, आता सवर्णांनी भोगायला हवे, भारतात आर्थिक निकषांवर आरक्षण असायला हवे, आरक्षण हे दर्जाच्या आणि प्रगतीच्या विरूद्ध आहे, आरक्षण हे अढळ आणि सदासर्वकाळ रहायला हवे, त्यात बदल होवू नये असे आक्षेप आणि भ्रम आरक्षणाच्या बाबतीत लोकांमध्ये आहेत. मात्र ते अर्धसत्य किंवा चुकीच्या गृहीतकावर आधारित आहेत.

सध्या भारतात विशेष करून महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये आरक्षणाची चर्चा मोठया प्रमाणात होत आहे. सवर्णाचा आरक्षण विरोधी उद्रेक किंवा 'आम्हालाही आरक्षण हवे' ही भावना रस्त्यावरच्या मोर्च्यातून व्यक्त होत आहे. आरक्षण लागू झाल्यापासून आणि त्याला इतकी वर्षे लोटल्यावर आरक्षण व्यवस्थेबद्दल एक प्रकारची Anti – Incumbency सवर्ण वर्गात तयार झालेली आहे. याला फक्त सवर्णामधील आरक्षणाबाबतचे दुराग्रह एवढेच कारण नाही. त्याहीपेक्षा आरक्षण ही व्यवस्था निवडणुका जिंकण्याचे साधन म्हणून वापरणारे राजकारणी याला जबाबदार आहेत. आरक्षण नकोच आणि आरक्षण हे अनंत काळाचे सत्य आहे. हया दोन्ही भूमिका टोकाच्या आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नांचा विचार राजकीय भूमिकेच्या दृष्टीने न करता, त्याचा विचार विवेकी व मानवतावादी दृष्टीने करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय फायदया – तोटयाची गणिते बाजूला ठेवून त्यावर उपाय शोधने गरजेचे आहे. आरक्षणाचा प्रश्न रस्त्यावर आणि संख्या जमवून झुंडशाहीने कधीच सुटणार नाही. कारण झुंड कधीच सर्वसमावेशक विचार करत नाही. प्रत्येक झुंड किंवा मोर्चा 'आपल्या स्वार्थासाठी वाट्टेल' अशीच भूमिका घेणार आहे. त्यासाठी निष्पक्ष, प्रामाणिक अशा तज्ञ मंडळीकडून यावर विचारमंथन व्हावे. जनगणनेतून समोर येणाऱ्या लोकसंख्येच्या माहितीवर आधारित आरक्षणाचे परीक्षण व्हायला हवे. कोणती जात रस्त्यावर पटकन येईल, कोणता मोर्चा किती लाखाचा – लाभाचा यावर आरक्षणाची गणिते बांधत राहिल्यास समस्या दिवसेंदिवस गंभीर होत जाणार आहे.

भारतातील आरक्षण जातीच्या आधारावर दिले आहे. ज्या जातींची आरक्षणाची गरज खंरच संपली आहे त्यांचे आरक्षण काढून घेण्याची राजकीय हिंमत आणि सामाजिक समज असणारे नेतृत्व असणे गरजेचे आहे. तसेच जातीच्या आधारावर आरक्षणाचे लाभ घेत असलेले त्याच जातीतील सवर्ण तयार झाले आहेत. आरक्षणाचे लाभ संबंधीत जातीतील मुठभर लोक घेताना दिसत आहेत. जे पुढारलेले आहेत, शिक्षित झाले तेच लाभ घेत आहेत. त्याच जाती गटातील अनेक लोक आरक्षणाच्या फायदयापासून वर्षोनवर्षे आजही वंचित राहत आहेत. याचाही विचार होणे आवश्यक आहे. प्रत्येक जातीमधील गरीब लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना आरक्षण देणे अयोग्य



Scanned with CamScanner

आहे. आरक्षण हा गरिबी निर्मुलन कार्यक्रम नव्हे. 'गरिबी निर्मुलन' हे उद्दिष्ट योग्यच आहे. पण 'आरक्षण' हे त्याचे 'साधन' नाही. त्यामुळे आरक्षणा बाबतीत निष्पक्ष आणि विधायक निर्णय घेणे गरजेचे आहे.

आरक्षणाची मागणी विविध जातीसमूहांतून पुढे येताना दिसत आहे. त्याला जातीय अस्मितेतून खतपाणी घालण्याचे काम जातीयवादी नेते करित आहेत. त्यातून सामाजिक स्वास्थ बिघडत आहे. आपल्या जातीला आरक्षण मिळावे असे वाटणे प्रत्येक जातीला शक्य आहे. कारण आपापल्या जातीच्या चष्म्यातून बघताना संधी म्हणून आरक्षण दिसते. त्यातून जातीय स्पर्धा, जातीच्या अस्मिता, जातीय संघटन मजबूत होताना दिसते. त्याचा परिणाम संपूर्ण समाजातील जातीय सलोखा संपूष्टात येवून राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येत आहे. जात हे आपल्या देशाचे व्यवच्छेदक लक्षण आहे, तर आरक्षण ही सर्वात मोठी सामाजिक तरतूद आहे. त्यामुळे जाती – जातींच्या क्षणिक स्वार्थासाठी घेतले जाणारे बेजबाबदार निर्णय हे देशहितासाठी घातक ठरू शकतात.

आरक्षणाचा मुद्दा अलिकडच्या काळात फारच प्रकर्षाने पुढे आला त्याची भौतिक कारणे समजून घेवून त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. भौतिक प्रश्न सोडविण्यामध्ये अपयश आल्यावर राज्यकर्ते ऐहिक – अस्मितेचे मुद्दे उपस्थित करतात तसेच काही आरक्षणाच्या बाबतीतही घडत आहे. एक भारतातील वाढती लोकसंख्या यामुळे साधनसामग्रीवर ताण येत आहे. त्यातून जगण्याचा संघर्ष तीव्र होताना दिसतो. त्यातून सुटण्याचा एक मार्ग म्हणून आरक्षणाकडे पाहिले जात आहे. दुसरे, देशाचा औद्योगिक विकास मंदावला आहे त्यामुळे बेरोजगारी वाढत आहे. त्यातून तरूण वर्गामध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. रोजगाराच्या संधी वाढायला हव्यात. तिसरे, भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशात मोठया प्रमाणात लोकसंख्या रोजगारांसाठी शेतीवर अवलंबून आहे. मात्र अलीकडच्या काळात शेतीव्यवसाय धोक्यात आहे. शेतीमालाला भाव नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थकारण धोक्यात आहे. त्याच्याच परिणामातून आरक्षणाचा मुद्दा उग्र रूप धारण करीत आहे. थोडक्यात लोकसंख्या, बेरोजगारी, शेतीमालाला हमीभाव याचाही विचार होणे गरजेचे आहे.

थोडक्यात, आरक्षण ही एक सकारात्मक भेदभाव करणारी व्यवस्था आहे. ज्यांना सामाजिक इतिहासामुळे संधीच नाकारली गेली आहे, त्यांना समान संधी प्राप्त व्हावी म्हणून केलेली सोय म्हणजे आरक्षण होय. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे त्याचा मुख्य उद्देश आहे, असे असले तरी आरक्षणाचा वापर राजकारणाचे साधन म्हणून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षणाची कालानुरूप चिकित्सा आणि समीक्षा होणे गरजेची बाब आहे. आरक्षणाचा विधायक हेतू आणि त्याचे कारक महत्व लक्षात घेणे गरजेचे आहे. आरक्षण या संकल्पनेविषयीचे भ्रम दूर करणे गरजेचे आहे. आरक्षणाचा सामाजिक न्यायातून राजकारण विरहित विचार होणे आवश्यक आहे. आरक्षणासंबंधी वस्तुनिष्ठ, विवेकी व मानवतावादी भूमिका आवश्यक आहे. आरक्षणाच्या राजकारणातील गुंतागुंत लक्षात घेवून राष्ट्रीय एकात्मतेचा विचारही आवश्यक आहे. भौतिकविकासाचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे, तरच भावनिक मुद्दे बाजूला पडून विकासाचे राजकारण होईल.

**संदर्भ :–**

१. भणगे रविंद्र, (२०१६), आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण, डायमंड प्रकाशन, पुणे.
२. पवार प्रकाश, (२०१६),सामाजिक न्यायाची संघर्षभूमी – कॉंग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड प्रकाशन, पुणे.
३. कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय (संपा.),२००८, आरक्षण : सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद.
४. कराडे जगन्नाथ, (२००५), आरक्षण : धोरण आणि वास्तव,सुगावा प्रकाशन, पुणे.



Scanned with CamScanner

५. कांबळे बाळ, जगताप प्रदीप, (२०१७), आरक्षण आणि वास्तवता, विचारमंथन, मे – ऑगस्ट.
६. पवार प्रकाश, (२०१४), विधानसभा निवडणूक आणि आरक्षणाचा प्रश्न, परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ डिसेंबर.
७. पवार प्रकाश, (२०१५), मराठा आरक्षण, सकाळ इयर बुक,सकाळ प्रकाशन, पुणे.
८. पवार प्रकाश, (२०१४), मराठा आरक्षणाचे राजकारण, दै. महाराष्ट्र टाइम्स, २९ जून.
९. दै. सकाळ, लोकमत, पुढारी, लोकसत्ता यामधील लेखाचा संदर्भ घेतला आहे.
१०. पाटील एस., २०१८, आरक्षण – एक शोधनिबंध, ब्लॉग & Punerispeaks.com
११. www. Halbadarpan.com
१२. Makarand Desai Marathi. Blogspots.in



Scanned with CamScanner